महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

=============================================================================

जावक क्रमांक – ७३६/३८ दिनांक :- २८ मार्च , २०२५

प्रसिद्धिपत्रक

# महाराष्ट्रात 'म्हाडा'तर्फे येत्या आर्थिक वर्षात १९ हजार ४९७ सदनिका बांधण्याचे उद्दीष्ट

'म्हाडा'च्या सन २०२५-२६ साठी सादर १५९५६.९२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला प्राधिकरणाची मंजुरी

मुंबईत येत्या आर्थिक वर्षात ५ हजार १९९ सदनिकांचे बांधकाम करण्याचे उद्दीष्ट

मुंबई, दि. ३१ मार्च,२०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात 'म्हाडा'च्या मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या प्रादेशिक मंडळांमार्फत एकूण १९ हजार ४९७ सदनिकांचे बांधकाम करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी अर्थसंकल्पात ९२०२.७६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

म्हाडाचा सन २०२४-२५ चा सुधारित व सन २०२५-२०२६ चा अर्थसंकल्प प्राधिकरणास नुकताच सादर करण्यात आला. प्राधिकरणाच्या सन २०२५-२०२६ च्या १५९५६.९२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला व सन २०२४-२५ च्या १०९०१.०७ कोटी रुपयांच्या सुधारित अर्थसंकल्पाला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची नुकतीच मंजुरी मिळाली आहे.

म्हाडाच्या मुंबई मंडळाअंतर्गत येत्या आर्थिक वर्षात ५१९९ सदनिकांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ५७४९.४९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कोकण मंडळाअंतर्गत ९९०२ सदनिकांची उभारणी करण्याचे उद्दीष्ट असून सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात त्यासाठी १४०८.८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पुणे मंडळाअंतर्गत १८३६ सदनिकांचे बांधकाम करण्याचे उद्दीष्ट आहे. त्यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ५८५.९७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नागपूर मंडळाअंतर्गत ६९२ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.त्यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात १००९.३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर मंडळाअंतर्गत १६०८ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी २३१.१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

नाशिक मंडळाअंतर्गत ९१ सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात ८६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अमरावती मंडळाअंतर्गत १६९ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी अर्थसंकल्पात ६५.९६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

म्हाडाच्या या नव्या योजनांमुळे राज्यभरात नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध होण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

मुंबई मंडळातर्फे अर्थसंकल्पात वरळी, नायगाव, परळ बीडीडी चाळींच्या पुनर्विकास योजनेसाठी २८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जोगेश्वरी पूर्व येथील पीएमजीपी कॉलनी पुनर्विकास प्रकल्पासाठी ३५० कोटी रुपये, वांद्रे पश्चिम येथील परिध खाडी पुनर्विकास प्रकल्पासाठी २०५ कोटी रुपये, गोरेगाव सिद्धधार्थ नगर येथे सदनिका उभारणीसाठी ५७३ कोटी रुपये, परळ येथील जिजामाता नगर येथील भूखंडावर मुले व मुलींच्या निवासासाठी वसतिगृह उभारणीसाठी २० कोटी रुपये, गिरणी कामगारांच्या घरासाठी ५७.५० कोटी रुपये, बोरीवली सर्वे क्र. १६० वरील योजनेसाठी २०० कोटी रुपये, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील पुनर्वसन प्रकल्पासाठी २०० कोटी रुपये, पहाडी गोरेगाव प्रकल्पासाठी १७७.७९ कोटी रुपये, मालवणी झोपडपट्टी सुधार प्रकल्पासाठी ५० कोटी रुपये, मागाठाणे बोरीवली योजनेसाठी ८५ कोटी रुपये, एक्सर बोरीवली तटरक्षक दल योजनेसाठी ३० कोटी रुपये, गोरेगाव सिद्धधार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पासाठी २० कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे.

कोकण मंडळांतर्गतच्या पाचपाखाडी-ठाणे सावरकर नगर येथे दोन मजल्यांचे हेल्थ केयर सेंटर व निवासी घरकुल योजनेसाठी १५ कोटी रुपये, माजिवाडे-ठाणे विवेकानंद नगर येथे १०० बेडचे वृद्धाश्रम व काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह उभारणीसाठी ३० कोटी रुपये, विरार बोळींज येथे क्लब हाऊस, जलतरण तलाव व भूखंड विकसित करणे कामासाठी ३३.८५ कोटी रुपये, वर्तकनगर-ठाणे पोलीस वसाहत इमारतींचा पुनर्विकास कामासाठी ९० कोटी रुपये, गोठेघर प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) योजनेसाठी ११५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

नागपुर मंडळांतर्गत चंद्रपुर विशेष नियोजन प्राधिकरण योजनेसाठी ३७१.२० कोटी रुपये, टेक्सटाइल पार्क एम्प्रेस मिल योजनेसाठी ३५० कोटी रुपये अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================

Outward No. : 736/38 Dt. March 28, 2025

Press Release

# MHADA aims Construction of 19,497 Housing Units Across Maharashtra in FY 2025–26

### Budget of ₹15,956.92 Crore for FY 2025–26 Approved by the Authority

### Target of 5,199 Housing Units Set for Mumbai Region

Mumbai, March 31, 2025: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has announced its target to construct 19,497 housing units across the state in the upcoming financial year 2025–26. This will be executed through its regional boards in Mumbai, Pune, Konkan, Nashik, Amravati, Chhatrapati Sambhajinagar, and Nagpur. A budgetary provision of ₹9,202.76 crore has been allocated for this purpose under the approved annual budget.

The Authority recently reviewed and approved MHADA's revised budget for FY 2024–25 of ₹10,901.07 crore and the proposed budget for FY 2025–26 of ₹15,956.92 crore. Under the Mumbai Board, 5,199 housing units are planned for construction in 2025–26, with a financial allocation of ₹5,749.49 crore.

The Konkan Board aims to construct 9,902 housing units, with a budgetary allocation of ₹1,408.85 crore. The Pune Board has set a target of 1,836 units, for which ₹585.97 crore has been allocated. The Nagpur Board is expected to construct 692 units, with ₹1,009.33 crore earmarked.

In Chhatrapati Sambhajinagar, the target is 1,608 housing units, for which ₹231.10 crore has been allocated. The Nashik Board will construct 91 units with a provision of ₹86 crore, while the Amravati Board will construct 169 units with an allocation of ₹65.96 crore.

These new schemes are expected to facilitate access to affordable housing for citizens across Maharashtra.

For the Mumbai Board, ₹2,800 crore has been earmarked for the redevelopment of BDD chawls in Worli, Naigaon, and Parel. Additionally, ₹350 crore has been allocated for the PMGP Colony redevelopment project in Jogeshwari East; ₹205 crore for the Paridhi Khadi redevelopment project in Bandra West; and ₹573 crore for the construction of housing units at Siddharth Nagar, Goregaon.

## Other allocations under the Mumbai Board include:

* ₹20 crore for boys’ and girls’ hostels at Jijamata Nagar, Parel
* ₹57.50 crore for mill workers’ housing
* ₹200 crore for the project at Survey No. 160, Borivali
* ₹200 crore for the rehabilitation project within Sanjay Gandhi National Park
* ₹177.79 crore for the Pahadi Goregaon project
* ₹50 crore for the Malvani slum improvement project
* ₹85 crore for the Magathane Borivali project
* ₹30 crore for the Eksar Borivali Coast Guard housing project
* ₹20 crore for the Siddharth Nagar (Patrachawl) redevelopment project in Goregaon

**Under the Konkan Board:**

* ₹15 crore has been allocated for a two-storey healthcare centre and housing units at Pachpakhadi–Thane, Savarkar Nagar
* ₹30 crore for a 100-bed senior citizen home and working women’s hostel at Majiwada–Thane, Vivekanand Nagar
* ₹33.85 crore for development of a club house, swimming pool, and plots at Bolinj, Virar
* ₹90 crore for redevelopment of police housing at Vartak Nagar, Thane
* ₹115 crore for the Pradhan Mantri Awas Yojana (Urban) project at Gotegao

Under the Nagpur Board:

* ₹371.20 crore has been allocated for the Chandrapur Special Planning Authority scheme
* ₹350 crore for the Textile Park Empress Mill project

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA